PDF Compressor Free Version

# व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) महाराष्ट्र राज्य, वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर४४०-००१
दूरध्वनी क्र.०७१२-२५५६९१२, फॅक्स क्र०७१२-२५५३०१८ Email-ID:-mahaecotourism@mahaforest.gov.in

---

क्रमांक-व्य.सं(निपविमं)/प्र.क्र.१०/ १८ /२०१६-१७
नागपूर ४४०००१, दिनांक १३ मे, २०१६

प्रति,
१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, म.रा.नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर
३) व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., नागपूर यांचे प्रतिनिधी
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), म.रा.नागपूर
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.नागपूर
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर
८) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई

विषय:- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ बाबत कार्यकारी समितीची (Executive Committee) सभा दिनांक १० मे, २०१६.

संदर्भ:- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडील पत्र क्र.व्य.सं.(निपविमं)/प्र.क्र.१०/१४/२०१६-१७, दिनांक ०५/०५/२०१६

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीची (Executive Committee) सभा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १० मे, २०१६ रोजी सकाळी १०.१५ वाजता "टकले सभागृह" वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे पार पडलेली असून सभेचा मान्य कार्यवृत्तांत सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

सदस्य सचिव
कार्यकारी समिती
तथा
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

PDF Compressor Free Version

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 10 मे, 2016 रोजी सकाळी 10.15 वाजता "वनभवन" सिव्हील लाईन्स, नागपूर येथील टकले सभागृह येथे झालेल्या प्रथम सभेचा कार्यवृत्तांत**

सभेला खालीलप्रमाणे कार्यकारी समितीचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पद | पदनाम |
|---|---|---|---|
| 1. | श्री.सर्जन भगत, भा.व.से. | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), म.रा.नागपूर |
| 2. | श्री.बी.एस.के.रेडडी | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) नागपूर |
| 3. | डॉ.एस.एच.पाटील, भा.व.से | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), नागपूर |
| 4. | श्री. आर.एस.यादव, भावसे | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमिटेड, नागपूर यांचे प्रतिनिधी |
| 5. | श्री. हनुमंत के. हेडे | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी |
| 6. | श्री.एन.रामबाबू, भा.व.से. | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी कार्यकारी समितीच्या प्रथम बैठकीच्या सुरुवातीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर व इतर उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. सभेत खालील विषयवार व्यवस्थापकीय संचालक यांनी सादरीकरण केलेले आहे व त्यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | विषय | झालेली चर्चा | निर्णय |
|---|---|---|---|
| ०१. | **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ कार्यान्वित करण्याबाबत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची प्रगती.** | महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यालय दिनांक १६.०२.२०१६ पासून वनभवन येथे सुरु करण्यात आले आहे. मंडळाची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत दिनांक २३.०४.२०१६ रोजी करण्यात आलेली असून नोंदणी क्र.महा-२५८/१६(ना) असा आहे. मंडळाचे खाते स्टेट बँक ऑफ इंडिया, सिव्हील लाईन्स, नागपूर या बँकेत उघडण्यात आलेले असून, खाते क्रमांक ३५५६१६६२२४५७ हा आहे व लेखाशिर्ष उघडण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे असे व्यवस्थापकीय संचालक यांनी थोडक्यात माहिती दिली. | कार्यकारी समितीने समाधान व्यक्त केले. |
| ०२. | **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे नियामक मंडळ व कार्यकारी समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेबाबत.** | महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे नियामक मंडळावर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेबाबत व्यक्ती / संस्थांचे प्राप्त नामांकन, त्यांचे कार्य, अनुभव व मंडळाला उपयुक्तता बाबत चर्चा करण्यात आली. | नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्याबाबत खालील व्यक्ती / संस्थांचे नामांकनाचे प्रस्ताव मा. मंत्री (वने) तथा अध्यक्ष, नियामक मंडळ यांचे मंजुरीसाठी सादर करण्यास मंजुरी देण्यात आली. |

PDF Compressor Free Version

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तपशिल खालीलप्रमाणे.<br>१. व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक - क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर<br>२. स्थानिक सल्लागार समितीचे प्रतिनिधी-श्री. संजय देवराम मोंढे, सरपंच, ग्राम पंचायत मोहुर्ली<br>३. हॉटेल संघटनेचे प्रतिनिधी- मे.के.हॉस्पिटॅलिटी, मुंबई<br>४. ट्रॅव्हल संघटनेचे प्रतिनिधी - श्री. सुधीर पाटील, संचालक, मे. त्रिणा वर्ल्ड, मुंबई<br>५. निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे तज्ञ / संस्था - श्री अनुज खरे, पुणे. |
| | | महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेबाबत व्यक्ती / संस्थांचे प्राप्त नामांकन, त्यांचे कार्य, अनुभव व मंडळाला उपयुक्तता बाबत चर्चा करण्यात आली. | नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्याबाबत खालील व्यक्ती / संस्थांचे नामांकनाचे प्रस्ताव मा. मंत्री (वने) तथा अध्यक्ष, नियामक मंडळ यांचे मंजुरीसाठी सादर करण्यास मंजुरी देण्यात आली.<br>तपशिल खालीलप्रमाणे.<br>१.निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे संस्थांचे प्रतिनिधी - श्री. संजय करकरे, बीएनएचएस, नागपूर<br>२. वास्तुशास्त्रज्ञ - श्रीनिधी नांदेडकर अॅण्ड असोसिएटस, नागपूर<br>३. विशेषज्ञ - प्रो.निशी के. मुखर्जी, नागपूर |
| ३. | **महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ कार्यान्वित करण्याबाबत विविध शासन निर्णय व कार्यपध्दतीत बदल करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत.** | १. निसर्ग पर्यटन विकासा करीता राज्य योजना (२४०६-२२१५) अंतर्गत प्राप्त होणा या प्रस्तावास शासनास सादर करणे व मंजूर निधीचे वितरण करण्याबाबत अंमलात आणावयाची कार्यपध्दती बाबत चर्चा करण्यात आली आहे. सध्या निसर्ग पर्यटन विकास आराखडयास मान्यता देण्याची कार्यवाही दि.२४.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये नेमलेल्या निसर्ग पर्यटन तज्ञ समितीमार्फत | एकाना क्र.३ मधील प्रस्तावाला सभेमध्ये मंजूरी देण्यात आली व त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. |

PDF Compressor Free Version

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यात येत आहे. मंडळाचे उपविधीला शासनाने दि.२८.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असून ही जबाबदारी मंडळाचे कार्यकारी समितीकडे देण्यात आली आहे. उपविधींप्रमाणे कार्यवाही करुन निसर्ग पर्यटन विकास प्रकल्पांना मान्यता देणे व मंजूर निधी मंडळामार्फत संबंधित यंत्रणेकडे थेट वितरण करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.<br>२. मध्यप्रदेश राज्यात अंमलात असलेल्या कार्यपध्दती बाबत खात्री करुन शासनाने दिनांक २८.०९.२०१६ अन्वये मंजूर केलेल्या उपविधी प्रमाणे विकास आराखड्यास मान्यता देणे व निधी वितरण करणे बाबत प्रस्ताव शासनास सादर करणे योग्य राहील असे ठरले.<br>३. जिल्हा नियोजन मंडळाने निवडलेल्या निसर्ग पर्यटन स्थळाचे विकास आराखड्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यकारी समितीची पूर्व मान्यता मिळाल्यानंतर निधी अर्थसंकल्पित करुन घेणे व वितरण करणे योग्य राहील अशी शिफारस करण्यात आली. निधी वाटपाची कार्यवाही मात्र पूर्वीप्रमाणे संबंधित जिल्हा नियोजन मंडळातर्फे होईल. | |
| ४. | **सन २०१६-१७ या वर्षाचे कार्यआयोजना / वार्षिक प्रवर्तन अहवाल बाबत चर्चा.** | सन २०१६-१७ या वर्षात खालील कामे करणेबाबत प्रस्तावित करण्यात आली.<br>i. Establishment of office.<br>ii. Study of Good Practices prevailing in other states<br>iii. Preparation of Vision Document<br>iv. Appointment of Architects / Consultants<br>v. Guides Training<br>vi. Website Development<br>vii. Consolidation / Completion of Ongoing Projects | रकाना क्र.२ मध्ये दर्शविलेल्या वार्षिक प्रवर्तन अहवालास मंजूरी देण्यात आली. |

PDF Compressor Free Version

| | | | |
|---|---|---|---|
| | | viii. Initiation of Circuit Development | |
| ५. | **व्यवस्थापकीय संचालक यांना प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार प्रदान करणे.** | महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळात कार्यरत असलेल्या अधिका-यांना वन विभागातील तसेच वन विकास महामंडळातील समकक्ष अधिका-यांना देण्यात आलेल्या प्रशासकिय व तांत्रिक अधिकाराप्रमाणे प्रशासकिय व तांत्रिक मंजूरीचे अधिकार देण्यास शिफारस करण्यात आली. | स्थान क्र.२ मधील प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळात कार्यरत असलेल्या अधिका यांना प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार प्रदान करणेसाठी मंजूरी देण्यात आली. तसेच मंडळात कार्यरत असलेल्या विभागीय वन अधिकारी यांना कार्यालय प्रमुख म्हणून घोषितकरण्यास मान्यता देण्यात आली. |
| ६. | **व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय कार्यान्वित करणे.** | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन) नागपूर या पदाचे समायोजन करुन व्यवस्थापकीय संचालक चे पद निर्मिती दिनांक १५.०३.२०१६ चे शासन अधिसूचने अन्वये करण्यात आले असल्याने सदर पदास संलग्न वाहन व कार्यालयीन साधनसामुग्री मंडळाचे कामाकरीता हस्तांतरीत करण्यास संबंधितांना सुचना करण्यास विनंती आहे. | मंडळातील अधिका-यांना आवश्यक ती वाहने व कार्यालयीन साधनसामुग्री देण्यास सभेमध्ये मंजूरी देण्यात आली. |

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठकीचा समारोप करण्यात आला.

स्वा-
सर्जन भगत
अध्यक्ष, कार्यकारी समिती तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर